# बृहन्मुंबई महानगरपालिका

कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष कर्करोग आणि
बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरिवली (पू.)
(लो.टि.म. वैद्यकिय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई यांचे उपकेंद्र)

क्र. एलटीएच/370 /सीटीसी, पीएचओ एण्ड बीएमटीसी दि. 27.05.2019

## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकिय महाविद्यालय, शीव अंतर्गत उभारण्यात आलेल्या मनपा-कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र मागाठाणे, बोरिवली (पू.) येथील केंद्रासाठी खालील नमूद केलेली पदे कंत्राटी तत्त्वावर 6 महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. विहीत नमुन्यातील अर्ज http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अनु.क्रं.1 ते 4 या पदांसाठी रु. 300+ 5% GST आणि अनु.क्रं. 5 ते 8 या पदांसाठी रू.100 + 5% GST इतके अर्ज शुल्क मनपा-कॉम्प्रिहेन्सिव थॅलेसिमीया केअर, बालरोग रक्तदोष-कर्करोग आणि बोन मॅरो टान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पूर्व) येथे दि. 30.05.2019 ते दि. 11.06.2019 पर्यत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुटटी वगळून) स.10.00 ते दु. 1.00 या वेळेत भरून, पावती अर्जासोबत जोडून अर्ज मनपा-कॉम्प्रिहेन्सिव थॅलेसिमीया केअर, बालरोग रक्तदोष-कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, पहिला मजला, कनाकिया एक्सॉटिका समोर, सीसीआय कंपाऊंड, बोरिवली (पू.) मुंबई – 400 066. येथे सादर करावा. (दुरध्वनी क्र. 022 28541017-18).

| अनु क्र. | पदाचे नाव | अर्हता | पद संख्या | ठोक वेतन दरमहा |
|---|---|---|---|---|
| 1 | कनिष्ट बालरोग / प्रौढ रक्तदोष कर्करोग तज्ञ (Jr. Pediatric Adult / Hemato-Oncologist) | MD/DNB(Medicine) or equivalent degree approved by MCI & Fellowship in Clinical Hematology. MD/DNB (Pediatrics) or equivalent degree approved by MCI & Fellowship in Pediatric Hematology Oncology | 01 | 69000/- |
| 2 | विकृती शास्त्रज्ञ (पूर्ण वेळ) Pathologist (Full Time) | M.D/DNB (Pathology) OR equivalent degree approved by MCI | 01 | 69000/- |
| 3 | मानद हृदयरोग चिकित्सक (Visiting Cardiologist) | D.M. / D.N.B (Cardiology) or equivalent degree approved by MCI. | 01 | 20000/- |
| 4 | सहाय्यक वैद्यकीय अधिकारी (Asstt.Medical Officer) | a) M.B.B.S. or Degree Holder as per qualifications mentioned in Annex.I & II of MCI's rule of 1956<br>b) Registration of MMC is must.<br>c) Experience of two posts of 6 mths duration in any MCI Recognised Hospital. | 01 | 45000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | आहारतज्ञ (Dietician) | B.Sc. (Dietetics/Nutrition) from recognized University. Experience in Pediatric Oncology, Hematology and BMT will be preferred &/or PG degree in Dietetics/Nutrition will be given preference. | 01 | 18000/- |
| 6 | परिचारीका (Staff Nurse) | G.N.M. Nursing, Registration with Maharashtra Nursing Council – Necessary | 03 | 22000/- |
| 7 | वाहन चालक (Driver) | 10th pass. Heavy & Light Vehicle license is a must. Candidate with a minimum 2 yrs. experience will be given preference. | 01 | 9000/- |
| 8 | चतुर्थश्रेणी कामगार (IV Class employee) | 10th pass (10वी पास) – Experience in Hospital will be preferred. | 04 | 9000/- |

**वयोमर्यादाः-**

1. कनिष्ट बालरोग / प्रौढ रक्तदोष कर्करोग तज्ञ - 50 वर्षापर्यत.
2. विकृती शास्त्रज्ञ – 50 वर्षापर्यत
3. मानद हृदयरोग चिकित्सकः कमाल वयोमर्यादा- 50 वर्षापर्यंत.
4. सहाय्यक वैद्यकीय अधिकारीः कमाल वयोमर्यादा- 50 वर्षापर्यंत.
5. आहारतज्ञ: कमाल वयोमर्यादा 38 वर्षापर्यत.
6. परिचारीका: कमाल वयोमर्यादा 38 वर्षापर्यत.
7. वाहनचालकः कमाल वयोमर्यादा 38 वर्षापर्यत.
8. चतुर्थश्रेणी कामगारः कमाल वयोमर्यादा 38 वर्षापर्यंत.

**सर्वसाधारण अटीः-**

1. संबंधित विषयातील आवश्यक ती पदवी किंवा पदविका प्राप्त केल्यानंतर उमेदवारास व्यावसायिक अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.
2. उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहा पूर्वीच्या नावाने अर्ज करू शकतात.
3. उमेदवाराने पदविका/पदवी परिक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नांत उत्तीर्ण केली याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
4. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुद्ध पोलिस चौकशी/न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
5. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.
6. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
7. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
8. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

9. निवड झालेल्या उमेदवारास रुपये 100/- किंवा विधी आकाराप्रमाणे (वेतन मिळकतीनुसार) बॉन्ड पेपरवर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.

10. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून नेमणुकी नंतर एक महिन्याच्या आंत सादर करणे आवश्यक राहील.

11. सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकांची नियुक्ती कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

12. सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल.

13. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

**<u>विशेष सुचना :</u>**

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

आ) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

अर्जाचे विहित मुल्य अनु. क्रं.1 ते 4 या पदांसाठी रु 300+ 5% GST आणि अनु. क्रं.5 ते 8 या पदांसाठी रू. 100 + 5% GST मनपा. - कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, पहिला मजला, कनाकिया एक्सॉटिका समोर, मागाठाणे, बोरिवली (पू.) मुंबई – 400 066 येथे दि.30.05.2019 ते दि. 11.06.2019 रोजी (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुटटी वगळून) (स. 10.00 ते दु. 1.00 पर्यंत) भरून, त्याची पावती अर्जासोबत जोडावी. पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

विहित नमुन्यातील सर्व बाबींची पूर्तता केलेले अर्ज, आणि सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती, अलीकडेच काढलेले पासपोर्ट छायाचित्र त्यावर चिकटवुन कॉम्प्रिहेन्सिव थॅलेसिमीया केअर, बालरोग रक्तदोष-कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, पहिला मजला, कनाकिया एक्सॉटिका समोर, सीसीआय कंपाऊंड, बोरिवली (पू.) मुंबई – 400 066. (दुरध्वनी क्र. 022 28541017-18) येथे दि.30.05.2019 ते दि.11.06.2019 पर्यंत स. 10.00 ते दु. 1.00 वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. दि.11 .06.2019 दुपारी 1.00 या वेळेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबतीतील कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही.

पात्र उमेदवारांची यादी व मुलाखतीचा दिनांक मनपा-कॉम्प्रिहेन्सिव थॅलेसिमीया केअर, बालरोग रक्तदोष-कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, पहिला मजला, कनाकिया एक्सॉटिका समोर, सीसीआय कंपाऊंड, बोरिवली (पू.) च्या सुचना फलकावर लावण्यात येईल.

**सही/-**
उप आयुक्त (सा.आ.)